क्रमांक : ६५

# <u>महाराष्ट्र विधानपरिषद</u>

## <u>पत्रक भाग-दोन</u>

### <u>गुरुवार, दिनांक १७ ऑक्टोबर, २०२४/अश्विन २५ १९४६ (शके)</u>

**६५.** निदेशानुसार सर्व सन्माननीय सदस्यांना कळविण्यात येते की, महाराष्ट्र विधानसभेची सार्वत्रिक निवडणूक दिनांक २० नोव्हेंबर, २०२४ रोजी होणार असल्याची घोषणा भारत निवडणूक आयोगाने दिनांक १५ ऑक्टोबर, २०२४ रोजी केली आहे. उक्त दिनांकापासून म्हणजे दिनांक १५ ऑक्टोबर, २०२४ ते निवडणुकीची प्रक्रिया पूर्ण होण्याच्या दिनांकापर्यंतच्या कालावधीसाठी निवडणूक आयोगाने जारी केलेली आदर्श निवडणूक आचारसंहिता लागू राहणार आहे. आचारसंहितेनुसार निवडणूक आयोगाने निवडणूक प्रक्रीयेच्या कालावधीत कोणत्याही प्रकारे मोफत प्रवास करण्यावर बंधने घातलेली आहेत व ही बंधने विधानमंडळाच्या सदस्यांना देखील लागू आहेत.

**त्यामुळे विधानसभेची सार्वत्रिक निवडणूक प्रक्रिया पूर्ण होईपर्यंतच्या आचारसंहितेच्या कालावधीत मा.सदस्यांना महाराष्ट्र विधानमंडळ सदस्यांचे वेतन व भत्ते अधिनियम, १९५६ च्या कलम ५ (१-अ) नुसार विमान प्रवास, कलम ५ अक (१) नुसार आगगाडीने प्रवास (रेल्वे कुपन पुस्तिकांचा वापर) व बोटीने मोफत प्रवास तसेच कलम ५ अ नुसार राज्य मार्ग परिवहन वा अन्य परिवहन सेवांव्दारे मोफत प्रवास सुविधा अनुज्ञेय राहणार नाहीत.**

विधान भवन,
मुंबई,
दिनांक : १६ ऑक्टोबर, २०२४

**जितेंद्र भोळे,**
सचिव-१ (कार्यभार)
महाराष्ट्र विधानपरिषद

<u>प्रत माहितीसाठी व योग्य त्या कार्यवाहीसाठी :-</u>

(1) महाराष्ट्र विधानपरिषदेचे सर्व सन्माननीय सदस्य
(2) महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयातील सर्व अधिकारी व सर्व कक्ष
(3) महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयातील सर्व पक्ष कार्यालये